# मीच माझा झालो चोर

प्रकाशित: प्रसाद दिवाळी अंक २००८

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# मीच माझा झालो चोर

सन १९८२ मधील प्रसंग. मी तत्कालीन विदेश संचार सेवा व हल्लीचे टाटा समुहाने अंगिकारलेले विदेश संचार निगम लिमिटेडच्या सेवेमध्ये होतो. माझी नियुक्ती उत्तर प्रदेशातील देहरादून शाखेत रोखपाल पदावर झाली होती. आमचे कार्यालय (अहमद उपग्रह भुमि केंद्र) देहरादून शहरापासून साधारण २५ कि.मी.अंतरावर हरिद्वार रोड पासून आत लच्छिवाला जंगलात होते. कार्यालयाचा सर्व आर्थिक व्यवहार नवी दिल्ली स्थित सी.पी.ए.ओ.येथून होत असे. तिकडून आलेले धनादेश आम्ही देहरादून शहरातील स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेत वटवून रोख रक्कम लच्छिवाला येथे कामगारांमध्ये वाटप करित असत. स्टेट बॅंक ऑफ इंडियाची मुख्य शाखा देहरादूनचे जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात होती.

मी नेहमी प्रमाणे महिना अखेरीच्या दिवशी कामगारांचे मासिक वेतन व ओव्हरटाइम पेमेंट मिळून मोठया रकमेचा चेक वटविण्यासाठी कार्यालयाचे गाडीने मदतनीस व दोन सशस्त्र पोलिसांसह बॅंकेमध्ये सकाळी अकराचे सुमारास गेलो. त्या दिवशी स्वतंत्र उत्तरांचल मागणी साठी स्थानिक लोकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठया प्रमाणात मोर्चा नेऊन आंदोलन छेडले होते. नेहमीचे सवयीप्रमाणे मी एकनेहमीची साधारण आकाराची सूटकेस व एक लेदरची हॅंड बॅग कॅश आणणे साठी बरोबर घेतली. परंतु दुर्दैवाने नेमके त्याच दिवशी मला बॅंकेकडून माझे मागणी प्रमाणे मोठया रकमेच्या १००,५० व २० रूपयांच्या नोटा मिळाल्या नाहीत तर सुमारे दोन अडीच लाखाचे पेमेंट ५, १० व २० चे रकमेच्या नोटांनी मिळाले. महिना अखेर असल्याने वेतन वाटप करणे आवश्यक होते. चेकवर पेमेंट मिळाल्याची सही केल्यामुळे मला मिळेल तशी रकम स्विकारणे क्रमप्राप्त होते. मिळालेली रकम बॅगेमध्ये बसत नव्हती म्हणून नाईलाजास्तव पुष्कळसे ५ व १० रू.चे बंडल मी इनशर्ट करून पोटाभोवती ठेवले. या माझ्या बॅंकेतील व्यवहारा दरम्यान बाहेर आंदोलनाने उग्र रूप धारण केले. चौकात दुकाने फोडली जात असल्याची बातमी आली. सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे हेतूने केवळ सरकारी वाहनांवर हल्ला केला जाण्याची शक्यता होती.

सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हाधिका-यांचे वाहन वगळता अन्य कोणत्याही वाहनास जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात बंदी असलेमुळे आमचे वाहन देखिल बॅंके पासून सुमारे अर्धा कि.मी.अंतरावर उभे करण्यात आले होते. माझे हातात बॅग व पोटाभोवती ५ व १० रू.ची अनेक बंडले असल्याचे फक्त मला, सहायकास व सोबतच्या पोलीसास माहित होते.

बाहेर चालू असलेल्या गोंधळापासून स्वसंरक्षणार्थ शक्कल लढवित एकाद्या मोठया गुन्हेगारास ज्याप्रमाणे बंदुकीच्या धाकाखाली घेउन जातात त्या प्रमाणे माझे पाठीला बंदुकीचे टोक लावून पोलीसास माझ्या पाठीमागे चालण्यास सांगितले व पोलिसही परिस्थिती लक्षात घेउन त्या गोष्टीस तयार झाले. त्यावेळी स्वतः चोर/गुन्हेगार बनण्या पलिकडे मजजवळ कोणताही पर्याय नव्हता. गाडीत बसताच क्षणाचा विलंब न करता व मागे न पाहता वेगाने लच्छिवालाकडे प्रयाण केले व सुटकेचा श्वास सोडला.

तेथे गेल्यावर पोटाभोवती ठेवलेले नोटांचे पुडके पाहून माझे अधिकारी अचंभित झाले बेजबाबदार वर्तणुकी बद्दल मजवर भडकले परंतु खरी परिस्थिती कथन केल्यावर राग शांत झाला व कौतुकास्पद उदगार निघाले.

ऐकून थोडेसे नवल वाटले ना! पण खरंय ते. कारण त्यावे वेळेची परिस्थिती व मजवर आलेला प्रसंगच तसा फार मोठा होता. दुर्दैवाने काही घडले असते तर माझे फार मोठे नुकसार झाले असते.